# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

दूरध्वनी क्र. 0724-2424442 फॅक्स 0724-2435007

email address -rdc_akola@rediffmail.com web address :www.akolanic.in


क्र.कक्ष2/गृह/प्र.स./कावि 75 /2020 दिनांक: 17/ 03 /2020

## आदेश

कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) बाबत अफवा पसरविणा-यावर कायदेशिर व दंडनिय कारवाई.

वाचा -
१. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना दिनांक १४ मार्च २०२०
२. साथरोग अधिनियम,१८९७
3. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांचे पत्र जा.क्र. अजिप/ साप्रवि/स्था-१/कावि-३५१/२०२०

ज्या अर्थी, शासनाने *करोना* विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ लागु करण्यात आला असून, दिनांक १४ मार्च २०२० पासून लागू करुन अधिसूचना निर्गमित केली आहे. करोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरिता साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक निर्गमित करण्यात आलेली अधिसूचना व नियमावली मधील तरतुदीनुसार सक्षम प्राधिका-याचे मान्यतेने दिनांक 3१ मार्च २०२० पर्यत गर्दी व वर्दळीचे ठिकाणे बंद ठेवण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. तसेच सदर अधिसूचनेमध्ये कोव्हीड - १९ बाबत कोणत्याही प्रकारची अनधिकृत अफवा पसरविणा-यावर कारवाई करणे बाबत सूचित केले आहे.

त्या अर्थी, **साथरोग अधिनियम १८९७ मधील खंड २,३ व ४** मधील तरतूदीनुसार तसेच **आपत्ती व्यवस्थापन कायदा - २००५ व दिनांक १४.३.२०२० चे अधिसूचनेच्या** अधिन राहून मला असलेल्या अधिकारानुसार मी, **जितेन्द्र पापळकर, भाप्रसे जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी , अकोला यादवारे असे आदेशित करतो की,** कोणत्याही व्यक्तीस/ संस्था/संघटनांना कोव्हीड - १९ बाबत **कोणत्याही प्रकारची अफवा, अनधिकृत माहिती ईलेक्ट्रॉनिक किंवा सोशल मिडीयाच्या माध्यमातून पसरविणा-स प्रतिबंध करण्यात येत आहे.** या बाबत आयुक्त, आरोग्य सेवा संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान, संचालक, आरोग्य सेवा, मुंबई संचालक,आरोग्य सेवा, पुणे व संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांचेमार्फत अधिकृत माहितीचे प्रसारण करण्यात

Nitin 39

Scanned with CamScanner

येईल. या बाबतची कोणतीही अनधिकृत माहिती अथवा पसरविणाऱ्या व्यक्ती अथवा संस्था अथवा संघटना या कायद्यान्वये कायदेशीर व दंडनिय कारवाईस पात्र राहील.

त्याच प्रमाणे, (1) या आदेशाद्वारे विहीत करण्यात आलेल्या कोणत्याही निर्बंधांची किंवा, काढलेल्या आदेशाची अवज्ञा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने, भारतीय दंड संहिता,(१८६० चा ४५ ) याच्या कलम १८८ अन्वये शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे असे मानन्यात येईल.

सदर आदेश आज दिनांक १७ मार्च २०२० रोजी माझे स्वाक्षरी व शिक्यानिशी निर्गमित करण्यात येत आहे.

(जितेंद्र पापळकर, भा.प्र.से.)
जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
अकोला

**प्रतिलिपी -**

१. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई
२. उपसचिव, महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रिडा विभाग मंत्रालय मुंबई
३. मा. आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.

यांना माहिती करिता सादर

४. जिल्हा पोलीस अधिक्षक, अकोला. **यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी उपरोक्त आदेशाची अंमलबजावणी होण्याचे दृष्टीने आपले अधिनस्त सर्व पोलीस यंत्रणा तसेच सायबर क्रामई ब्रान्च व संबंधीत विभागांना आवश्यक ती कार्यवाही करणे बाबत आपलेस्तरावरुन सूचित करावे.**
५. आयुक्त, अकोला महानगर पालिका अकोला.
६. उपविभागीय अधिकारी ---------------------------------- सर्व.
७. तहसिलदार------------------------------------------ सर्व
८. जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांना माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव. त्यांनी सदर माहीतीस बातमिच्या स्वरुपात व्यापक प्रसिध्दी देण्याचे दृष्टीने विनामुल्य प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी
अकोला

Scanned with CamScanner